# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**तक्रार क्र. १३५/२०१८/जालना**
**(द्वितीय अपील क्र.२९२२/२०१७ मध्ये)**

श्री.शामराव सुंदरराव खरात, : तक्रारदार
रा.पाथरवाला बु.ता.अंबड,जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, संगोया, तहसील कार्यालय,
अंबड,जि.जालना

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,अंबड,जि.जालना

राज्य माहिती आयोग

**निर्णय**
**(सुनावणी दि. ०७.११.२०२३)**

तक्रारदार यांनी दि.०५.०३.२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यामध्ये आयोजित आजच्या सुनावणीस तक्रारदार व श्री.कचरु जगनाथ काथार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगोया),तहसील कार्यालय अंबड,जि.जालना ,श्री.नंदकिशोर येडूबा दांडगे, (से.नि.) तत्कालीन जन माहिती अधिकारी,नायब तहसीलदार (संगोया),तहसील कार्यालय अंबड ,जि.जालना उपस्थित आहेत.

"तक्रारदार यांनी खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

आयोगाचे आदेश असतानाही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेशाचे पालन केले नाही. " अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) व (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.२९२२/२०१७ मध्ये दि.०८.१२.२०१७ (निर्गमित दि.१/२/२०१८ )रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेले होते.

" वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय अंबड,जि.जालना यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. "

सदर प्रकरणामध्ये यापूर्वी दि.११.१०.२०१८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदरील सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी पुढील तारीख ठेवण्यात आली आहे.

दि.१४.०६.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली होती.त्यामध्ये श्री.कचरु जगनाथ काथार,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार संगायो,तहसील कार्यालय अंबड,ता.अंबड,जि.जालना उपस्थित होते.सुनावणीवेळी आयोगाने परित केलेला आदेशाप्रमाणे कोणती कार्यवाही केली यासंदर्भात अभिलेखे / पुरावा ते सादर करु शकले नाहीत. त्यांनी सूचित केले की, श्री.एन. वाय. दांडगे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे सेवानिवृत्त झाले आहेत.

सबब पुढील सुनावणीला श्री.एन. वाय. दांडगे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांना उपस्थित राहण्यासाठी कारणे दाखवा नोटीस दि.०३.०८.२०२३ रोजी देण्यात आली होती. त्यांनी दि.२२.०८.२०२३ रोजी आपला खुलासा आयोगाकडे सादर केला. त्यामध्ये त्यांनी सूचित केले की, आयोगाच्या आदेशानुसार दि.१६.०५.२०१८ रोजी तक्रारदार यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे दिनांक २४.०५.२०१८ रोजी माहिती पाठविण्याल आलेली आहे. सुलभ संदर्भासाठी या सोबत छायांकित प्रत सादर केली आहे. मी नियत वयोमानाने दि.३१.१०.२०२२ रोजी तहसिल कार्यालय भोकरदन जि.जालना येथून नायब तहसीलदार या पदावरुन सेवानिवृत्त झालेला आहे. मी आयोगाने व्दितीय अपीलमध्ये दिलेल्या आदेशानुसार विहीत वेळेत कार्यवाही केलेली आहे. सबब ती सादर केलेल पुरावा सुनावणीमध्ये ग्राहय धरण्यात यावा आणि माझेवर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येवू नये ही नम्र विंनती,केली आहे,असा खुलासा आयोगासमोर सादर केला आहे.

उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, दि.१६.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्व्ये तक्रारदार यांना याप्रमाणे कळविण्यात पुढीलप्रमाणे कळविण्यात आले आहे. सय्यद अबीदाबी ईस्माईल रा. पाथरवाला बु. यांनी दि.२.३.२००९ रोजी राष्ट्रीय वृध्दपकाळ निवृत्तीवेतन मिळण्यासाठी अर्ज केला होता. श्रीमती सय्यद अबीदाबी ईस्माईल रा. पाथरवाला बु. यांच्या अर्ज या कार्यालयातील संगायो विभागातील सर्व अभिलेखची तपासणी केली असता त्यांच्या अर्ज मिळून आलेला नाही. त्यासाठी तत्कालीन नायब तहसीलदार श्रीमती शेडोळकर व शिपाई चौरे व इतर दोन कोतवाल यांच्या पथकमार्फत सर्व अभिलेख तपासणी करण्यात आली असता सदर अर्ज मिळून आलेला नाही. परंतु अर्जदार श्रीमती सय्यद अबीदाबी ईस्माईल रा.पाथरवाला बु.यांनी या कार्यालयात दि.२०.०२.२०१८रोजी ऑनलाईन अर्ज सादर केला होता. तो अर्ज दि.२३.०२.२०१८च्या बैठकीमध्ये मंजुर करण्यात आला आहे. अनुदान मागणी करण्याचे कार्यवाही चालू आहे. अशा प्रकाराची माहिती तक्रारदार यांना कळविली आहे.

दिनांक ०९.१०.२०२३ रोजी सदर प्रकरणावर सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु काही तांत्रिक कारणामुळे सदर सुनावणी होऊ शकली नाही.

आज दिनांक ०९.११.२०२३ रोजीच्या सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी यांनी कथन केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे मला माहिती मिळालेली नाही.

व्दितीय अपील क्र.२९२२/२०१७चा आदेशाचे अवलोकन केले असता असे आढळून आले की, अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१६.०१.२०१७ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

" माहितीचा अधिकार २००५ची अमलबजावणी न करणा-या तहसीलदार/ नायब तहसीलदार महसूल, संगायो अंबड विरुध्द कारवाई करणेबाबत, दि.०१.१०.२०१२ ते दि.१६.०१.२०१७, माझा दि.२८.०९.२०१६ रोजी आपणाकडे माहितीचा अधिकार २००५ ची अंमलबजावणी न करणा-या तहसीलदार/ नायब तहसीलदार महसूल व संगायो अंबड विरुध्द जिल्हाधिकारी जालना यांनी दि.३०.१०.२०१२/०१.०३.२०१३ व दि.२५.०३.२०१३रोजी पत्र देवूनही व मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद यांनी लेखी आदेश देवूनही सी आर नं. २१४३/२०१२, दि.२०.०२.२०१४/सीआरनं.२८४७/२०१२,दि.०३.०९.२०१४/सीआरनं.२१२१/२०१३,दि.०४.१२.२०१४ रोजी आदेश देवूनही तहसीलदार अंबड व नायब तहसीलदार महसूल व संगायो यांनी माहिती न दिल्यामुळे माहितीचा अधिकार २००५ शासनाचे दि.३१.०३.२००८च्या परिपत्रकानुसार आपण केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईची माहिती द्यावी. "

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतीसाद दिला असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सादर केला खुलासा हा आयोगास माहिती अर्जाच्या वस्तुस्थितीनुसार ( IN FACT) नसल्याने आणि विलंबाने माहिती दिली असल्याचे आढळून आल्यामुळे श्री.कचरु जगनाथ काथार,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (संगोया), तहसील कार्यालय अंबड,जि.जालना यांनी माहितीचा शोध घेवून जोडपत्र "अ" मधील मागितलेली माहिती आणि पुरवलेली माहिती बरोबर,असल्याबाबतचे शपथपत्र, तक्रारदार यांना देवून त्याची एक प्रत आयोगाला सादर करण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे अंतरिम आदेश देत आहे.

## अंतरिम आदेश

श्री.कचरु जगनाथ काथार,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (संगोया), तहसील कार्यालय अंबड,जि.जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात व्दितीय अपील क्रमांक २९२२/२०१७ मधील आदेशानंतर केलेल्या कार्यवाहीचा शोध घेवून जोडपत्र अ मध्ये मागतिलेली माहिती आणि तक्रारदारास पुरवलेली माहिती बरोबर असल्याबाबतचे शपथपत्र,तक्रारदार यांना देवून त्यांची एक प्रत आयोगास सादर करावी. अन्यथा आपण काहीही कार्यवाही केली नाही, असे गृहित धरुन आपल्या विरुध्द पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

तक्रार क्र.१३५/२०१८/जालना/एबीजे/जावक क्र. 19629 /२०२३ दिनांक : 26/12/2023

प्रत :- जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.